नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 07/08/2020 (शुक्रवार)

(सकाळ)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 2 किमी अंतरावर मौजा भांडेवाडी फाटा येथे दिनांक 06/08/2020 चे 12.10 वा. दरम्यान पो.स्टे अरोली ला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पो. स्टे. अरोली चा स्टाफने एमच–40/बीई–5403 क्रमांकाच्या ट्रैक्टरचा चालक व एमएच– 40/एल–8030 क्रमांकाच्या ट्रालीचा चालक आरोपी नामे– गणेश भगवान थोटे, वय 34 वर्ष, रा. चोखाळा यास थांबवून तपासले असता वाहनात त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 3,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 5,03,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक नरेश श्रावणकर, पो. स्टे. अरोली यांच्या रिपोर्टवरून पो. स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.



## घरफोडी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर नरसाळा कन्हान येथे दिनांक 05/08/2020 चे 22:00 वा. ते दिनांक 08/08/2020 चे 04:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश जयराम सराटकर, वय 57 वर्ष, रा. नरसाळा कन्हान यांच्या घराच्या मागील दाराचा अज्ञात आरोपीने कोंडा घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने फिर्यादींच्या घरातील लोखंडी आलमारीत ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने 41,100/–रू. चोयन नेले. तसेच शेजारी राहनारे दिनेश भोले यांच्या घराच्या समोरील दाराचा अज्ञात आरोपीने कुलूप कोंडा तोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने घरातील लोखंडी कपाटामधील सोन्या–चांदीचे दागिने एकुण किमंती 13,000/–रू. चा माल असा एकुण कि. 54,100/–रू. मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवा वरखडे 9637005303 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर